**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शनिवार, दिनांक 20/02/2016 रोजी सकाळी 11.00 वाजता झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 01.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | **मंजूर.** |
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | सन 2016-2017 या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समिती अंतर्गत कल्याणकारी योजना राबविणेबाबत, **महिला व बालकल्याण समितीचा दिनांक 21/01/2016 रोजीचा ठराव क्र. 12,** आयुक्तांचे दिनांक 13 जानेवारी 2016 चे पत्र क्र. नमुंमपा/स.वि.वि./49/2016. |
| **ठराव क्र. 825.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, सन 2016-2017 या आर्थिक वर्षात महिला व बालकल्याण समिती अंतर्गत कल्याणकारी योजना राबविण्यासंबंधातील प्रस्तावित अटी व शर्तीसह सदर योजना अंदाजपत्रकीय मंजूरीच्या मर्यादेच्या खर्चास अधिन राहून यापुढे पंचवार्षिक आर्थिक वर्षात राबविण्याच्या प्रस्तावास, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | 2016-2017 या आर्थिक वर्षात समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती अंतर्गत मागासवर्गीय घटकांकरीता कल्याणकारी योजना राबविणेबाबत, **समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समितीचा दिनांक 29/01/2016 रोजीचा ठराव क्र. 16.** आयुक्तांचे दिनांक 13 जानेवारी 2016 चे पत्र क्र. नमुंमपा / समाजविकास / 50/2016. |
| **ठराव क्र. 826.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, सन 2016-2017 या आर्थिक वर्षात समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती अंतर्गत मागासवर्गीय घटकांकरीता कल्याणकारी योजना राबविण्यास तसेच सदरील योजनांची आर्थिक तरतुद अंदाज पत्रकामध्ये समाविष्ट करणेकरीता व अंदाजपत्रकीय तरतुदीच्या मर्यादेपर्यंतच्या खर्चास अधिन राहुन उक्त योजना पंचवार्षीक वर्षाकरिता राबविण्यास आणि प्रस्तावात नमुद करण्यात आलेली योजना क्रमांक 8 व 9 साठी प्रस्तावित अनुदान 10% (दहा टक्के) ऐवजी 50% (पन्नास टक्के) देण्यास सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी" |
| **निर्णय -** | **मंजूर.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | सन 2016-2017 या आर्थिक वर्षात नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील युवक/युवतींकरिता विविध कल्याणकारी योजना राबिवणेबाबत, **विद्‌यार्थी व युवक कल्याण समितीचा दिनांक 04/02/2016 रोजीचा ठराव क्र. 03,** आयुक्तांचे दिनांक 28 जानेवारी 2016 चे पत्र क्र. नमुंमपा/स.वि.वि/112/2016. |
| **ठराव क्र. 827.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | "आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशिलवार दिल्याप्रमाणे, सन 2016-2017 या आर्थिक वर्षात नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील युवक/युवतींकरिता विविध कल्याणकारी योजना मध्ये योजना क्रमांक 01 ते 09 समाविष्ट असून त्यात योजना क्रमांक 10 म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्त महानगरपालिकेच्या क्षेत्रातील प्रत्येक प्रशासकिय विभागतील (Administrative ward) विविध क्षेत्रात प्रथीत यश संपादित केलेल्या प्रत्येकी 03 विद्‌यार्थी/विद्‌यार्थींनीना विशेष शिष्यवृत्ती देणे, तसेच योजना क्र. 6 बाबत खेळाडूंची वयोमर्यादा 30 इतकी करण्यास आणि सदरच्या योजना अंदाजपत्रकीय मुजंरीच्या मर्यादेच्या खर्चास अधिन राहून यापुढे पंचवार्षिक आर्थिक वर्षात राबविण्यास प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | बेलापूर विभागातील से. 19/20 मधील टोटल कार मॉल ते पंपहाऊस पर्यंत रस्त्याची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./87/2016. |
| **ठराव क्र. 828.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | "बेलापूर विभागातील से. 19/20 मधील टोटल कार मॉल ते पंपहाऊस पर्यत रस्त्याची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 93 लाख, 27 हजार, 305 मात्र इतक्या खर्चास, तसेच नियमानुसार देय असलेल्या भाववाढीपोटीच्या रक्कमेस, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | बेलापूर विभागातील से. 36 करावे येथील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./88/2016. |
| **ठराव क्र. 829.**<br>**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** | "बेलापूर विभागातील से. 36 करावे येथील अंतर्गत रस्त्याची दुरुस्ती व सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 24 हजार, 16 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर.</u>** |

**तां. का. क्र. 13.** सन 2016-17 या वर्षाकरिता मालमत्ता कराचे दर ठरविण्याबाबत.
**दिनांक 20 फेब्रुवारी 2016** (स्थायी समितीचा दिनांक 18 फेब्रुवारी 2016 चा ठराव क्र. 118)

**ठराव क्र. 913.**
**दिनांक 20 फेब्रुवारी 2016**

"नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील निवासी, अनिवासी व औद्योगिक मालमत्ता संबंधात सन 2016-2017 या शासकीय वर्षाकरीता खालील तक्त्यामध्ये तपशीलवार दिलेल्या दराने मालमत्ता कर, वृक्षकर, इत्यादी आकारण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 99 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजूरी देण्यात यावी."

| अ. क्र. | कराचा प्रकार | प्रस्तावित दर | | |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | अनिवासी | औद्योगिक |
| 1 | सामान्य कर (0.5% अग्निशमन करासहीत) | 23.50% | 32.50% | 34.50% |
| 2 | जल लाभ कर | 1% | 4% | 3.00% |
| 3 | मलनि:स्सारण कर | 3% | 7% | 0.00% |
| 4 | मलनि:स्सारण लाभ कर | 1.% | 2% | 3.00% |
| 5 | महापालिका शिक्षण कर | 1% | 4% | 4.00% |
| 6 | पथ कर | 2.67% | 3.33% | 8.33% |
| 7 | वृक्ष कर | 0.50% | 0.50% | 0.50% |
| | **एकूण** | 32.67% | 53.33% | 53.33% |

**निर्णय -** **मंजूर.**

महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्ताकडे पाठविलेल्या सन्मा. नगरसेवकांच्या ठरावांची यादी.

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55 मध्ये से. 11 ला लागून नाला आहे रिलायन्स फ्रेश मॉल जवळील पूलापासुन ते रेल्वे लाईन पर्यंतच्या नाल्याच्या बाजूने रस्ता बनविलेला आहे. त्यास लागून नाल्याच्या बाजूने सुरक्षेच्या दृष्टीने फेन्सींग उभारणे, तसेच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने स्लोपींग (उतारावर) प्रमाणे गार्डन विकसीत करणे. | 7<br>फेब्रुवारी | 830<br>20/02/2016 | मंजूर |
| 2. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55 से. 11 रिलायन्स फ्रेशच्या मागील बाजूस जाणाऱ्या बाजूने जॉगींग ट्रॅक बनविलेला आहे. त्याचे नुतनीकरण करणे. तसेच ट्रॅकच्या बाजूने स्लोपींगच्या उताराजवळ असलेल्या फुटपाथवरील लिकर कोटींगचे पेवर ब्लॉक बसविणे. | 8<br>फेब्रुवारी | 831<br>20/02/2016 | मंजूर |
| 3. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 55 खारघरणेगांव येथे सी.सी.टी.व्ही कॅमेरा बसविणे. | 9<br>फेब्रुवारी | 832<br>20/02/2016 | मंजूर |
| 4. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर, अंतर्गत स्मशानभुमीच्या बाहेर आग्नेय कोपऱ्यावर असलेल्या हरितपट्ट्याचे लवकरात लवकर सुशोभिकरण करुन लोकांना एक छोटेसे उद्यान उपलब्ध करणे. | 10<br>फेब्रुवारी | 833<br>20/02/2016 | मंजूर |
| 5. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील शाळा क्र. 17 येथील संगणकीय ठेका संपला असुन सदर शाळेत संगणकीय शिक्षण बंदच झालेले आहे तरी तेथे ताबडतोब संगणकीय ठेकेदार नेमुन विदयार्थ्यांचे होणारे नुकसान टाळावे. | 11<br>फेब्रुवारी | 834<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 6. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मध्ये सेक्टर 2 व 4 मध्ये सी.सी.टी.व्ही कमेरे बसविणे. | 12<br>फेब्रुवारी | 835<br>20/02/2016 | मंजूर |
| 7. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मध्ये सेक्टर 2 वारणा कॉलनी ते आम्रपाली सोसायटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | 13<br>फेब्रुवारी | 836<br>20/02/2016 | मंजूर |
| 8. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मध्ये जुईनगर स्टेशनपासुन ते पाण्याच्या टाकीपर्यंत असलेले पदपथ दुरुस्ती करणे | 14<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 9. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 82 मधील गणेश मद्यानाचे सुशोभिकरण करणे | 15<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 10. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82 मध्ये अपोलो सोसायटी ते आनंदवन सोसायटी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 16<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 11. | **श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये पाण्याची कपात असल्याने नागरीक विहिरींच्या पाण्याचा वापर करीत आहेत. तरी महापालिका क्षेत्रातील सर्व विहिरी स्वच्छ करुन पाण्याची तपासणी करुन वापरण्यास योग्य की अयोग्य ते फलक लावावे व परिसर सुशोभिकरण करणे. | 17<br>फेब्रुवारी | 837<br>20/02/2016 | मंजूर |
| 12. | **श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील तलावामध्ये दरवर्षी गणेशमुर्ती/ देवीमुर्ती विसर्जन होऊन पाणी अस्वच्छ झाले आहे. अनेक वर्ष तलावातील गाळ काढला नाही. तरी महापालिका क्षेत्रातील सर्व तलावांचे गाळ काढणे. | 18<br>फेब्रुवारी | 838<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 13. | **श्री. जयवंत द. सुतार, यांजकडून :-** शिरवणे प्रभाग क्र. 81 मध्ये सिडकोने गांवठाण विस्तार योजना राबवून भुखंड वितरीत केले आहेत. सदर भुखंडावर इमारती बांधून रहिवाशी वास्तव्या करीता आले आहेत. महापालिकेच्या वतीने प्रत्येक रस्त्यास नांव दिले आहे. परंतू रस्त्याच्या नामकरण फलक तुटलेले आहेत. तरी सदर नाम फलक नव्याने डिझाईन करुन फलकावर भुखंड दिशा दर्शक फलक लावणे. | 19<br>फेब्रुवारी | 839<br>20/02/2016 | मंजूर |
| 14. | **श्री. देवीदास अनंतराव हांडेपाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 42, मधील सेक्टर 16 मधील भुखंड क्र. 38 हा डिस्पेन्सरी साठी राखीव म्हणून महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेला आहे. परंतू अगदी जवळच महापालिकेचे माता बाल रुग्णालय अस्तित्वात आहे. म्हणून भुखंड क्र. 38 चे आरक्षण बदलून तेथे बहुउद्देशीय इमारत बांधणे. | 20<br>फेब्रुवारी | 840<br>20/02/2016 | मंजूर |
| 15. | **श्री. देवीदास अनंतराव हांडेपाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 42 कोपरखैरणे, सेक्टर 23 येथील भुखंड क्र. 20 ए हा भुखंड सिडकोकडून महानगरपालिकेला शाळेसाठी हस्तांतरीत झालेला आहे. त्या भुखंडावर महानगरपालिकेच्या शाळेसाठी इमारत बांधणे. | 21<br>फेब्रुवारी | 841<br>20/02/2016 | मंजूर |
| 16. | **श्री. देवीदास अनंतराव हांडेपाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 42, कोपरखैरणे सेक्टर 23 येथे श्री गणेश पंचम सौजन्य व श्री. लक्ष्मी या 18:00 चौ.मि. च्या अल्प उत्पन्न गटातील वसाहती मध्ये अंतर्गत पाण्याच्या लाईन बदलणे. | 22<br>फेब्रुवारी | 842<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 17. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 मध्ये सिडकोने विकसित केलेल्या घणसोली सेक्टर 2 या क्षेत्रातील श्री मुक्कांबिका मंदिराच्या बाजूस बछया स्वरुपात असलेली नागरी वसाहत हागणदारी मुक्त करण्यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून या वसाहतीमध्ये योग्य संख्येच्या शौचालयाची उभारणी करणे. | 23<br>फेब्रुवारी | 843<br>20/02/2016 | मंजूर |
| 18. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 मध्ये घणसोली विभागातील सेक्टर 5 येथील दगडी बांधकामाच्या गटारांची व त्यावरील पदपथांची दुरावस्था झाल्याने नागरीकांच्या जिवितास धोका उत्पन्न होणारी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे या गटारांची व पदपथांची योग्य पध्दतीने पुर्नबांधणी करणे. | 24<br>फेब्रुवारी | 844<br>20/02/2016 | मंजूर |
| 19. | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 33 घणसोली सेक्टर 4 मध्ये सिडकोच्या शहर नियोजन आराखडयानुसार बाजार मंडई फेरीवाला क्षेत्र म्हणून आरक्षित असलेला भुखंड क्रमांक 215 व त्या लगतची मोकळी जागा सिडकोकडून अधिग्रहीत करुन त्या ठिकाणी बाजार मंडईची उभारणी करणे. | 25<br>फेब्रुवारी | 845<br>20/02/2016 | मंजूर |
| 20. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, इश्वरनगर येथे सिध्दीविनायक मंदिर, ईश्वरनगर ते वाशी रेल्वे स्थानक (महापे मार्गे) नवी मुंबई महानगरपालिकेची बससेवा सुरु करणे. | 26<br>फेब्रुवारी | 846<br>20/02/2016 | मंजूर |
| 21. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथील संपुर्ण प्रभागात कचरा कुंडीची संख्या अपुरी असल्याने सदर ठिकाणी नवीन कचरा कुंडी देणे. | 27<br>फेब्रुवारी | 847<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 22. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 01, ईश्वरनगर येथे मन्नुभाई चाळ व तुळजा भवानी चाळीच्या मागील गटाराची अत्यंत दुरावस्था झाली असुन सदर ठिकाणी नवीन गटार बांधणे. | 28<br>फेब्रुवारी | 848<br>20/02/2016 | मंजूर |
| 23. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली-भुतावली गांव व महापे गाव येथील श्री.विलास पाटील यांच्या घरापासून ते श्री. यशवंत पाटील यांच्या घरापर्यंत, श्री. अमृत पाटील यांच्या घरापासुन ते श्री. सुखदेव जेपाल यांच्या घरापर्यंत, श्री. बाबु डाऊरकर यांच्या घरापासुन ते सार्वजनिक शौचालय पर्यंत श्री. ढवळे चाळ ते श्री. सोनावणे यांच्या घरापर्यंत जुनी व उघडी गटारे दुरुस्त करुन बंदिस्त करणे तसेच संभाजी नगर येथील श्री. तरे यांच्या घरापासून ते श्री. हाडळ यांच्या घरापर्यंत नवीन गटार बांधुन ते बंदिस्त करणे. | 29<br>फेब्रुवारी | 849<br>20/02/2016 | मंजूर |
| 24. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, महापे येथील हनुमान नगर, संभाजीनगर व अडवली-भुतावली गाव येथे सार्वजनिक मुतारी बांधणे. | 30<br>फेब्रुवारी | 850<br>20/02/2016 | मंजूर |
| 25. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 26, अडवली-भुतावली गावतील सार्वजनिक शौचालयाला मलनि:स्सारण वाहिनी जोडली नसल्याने शौचालया बाहेर घाण पाणी तिथेच साचुन दुर्गंधी पसरते. त्यामुळे तेथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी अडवली-भुतावली गावातील सार्वजनिक शौचालयांना मलनि:स्सारण वाहिनी जोडणे. | 31<br>फेब्रुवारी | 851<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 26. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103 मध्ये सिडकोने शहर नियोजन आराखडयानुसार सिबीडी बेलापूर येथील सेक्टर 8 बी मधील भुखंड क्र. 28 बी हा आरोग्य सेवा सुविधांसाठी आरक्षित असल्याने सदरचा भुखंड मनपाने सिडकोकडून रितसर ताब्यात घेऊन अथवा नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारात अधिग्रहीत करुन त्या ठिकाणी सर्व सेवा सुविधायुक्त अशा रुग्णालयाची उभारणी करण्याची कार्य पुर्तता करणे. | 32<br>फेब्रुवारी | 852<br>20/02/2016 | मंजूर |
| 27. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103 मध्ये सिडकोने शहर नियोजन आराखडयानुसार सिबीडी बेलापूर येथील सेक्टर 8 व सेक्टर 8 बी मध्ये दैनंदीन बाजार मंडई या सुविधेकरीता आरक्षित असलेले भूखंड मनपाने सिडकोकडून रितसर ताब्यात घेऊन अथवा नियोजन प्राधिकरणाच्या अधिकारात अधिग्रहीत करुन त्या दोन्ही ठिकाणी सर्व सेवा सुविधायुक्त सार्वजनिक बाजार मंडई बांधण्याची कार्य पुर्तता करणे. | 33<br>फेब्रुवारी | 853<br>20/02/2016 | मंजूर |
| 28. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 103 मधील सेक्टर 8 बी या क्षेत्राच्या पुर्वेकडील बाजूस असलेल्या दुर्गामाता नगर या 250 घरांच्या नागरी वसाहतीमध्ये जाण्यासाठी रस्ता नसल्याने त्या ठिकाणी राहणाऱ्या आबाल वृध्दांना, विशेषत: महिला वर्गास दैनंदीन कामासाठी त्याचप्रमाणे आजारी रुग्णांना औषध उपचारासाठी पायी तसेच वाहनाने मार्गक्रमण करण्यास अनेक अडचणी व समस्या उद्‌भवतात म्हणून दुर्गा माता नगराकडे जाण्यासाठी रस्त्याची उभारणी करणे. | 34<br>फेब्रुवारी | 854<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 29. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, पावणेगांव येथील सांडपाणी वाहुन नेणारी गटारे बांधणे. | 35<br>फेब्रुवारी | 855<br>20/02/2016 | मंजूर |
| 30. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, श्रमिकनगर प्राथमिक शाळेमध्ये इंग्रजी माध्यम सेमी इंग्रजी माध्यम बालवाडी सुरु करणे. | 36<br>फेब्रुवारी | 856<br>20/02/2016 | मंजूर |
| 31. | **सौ. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 48, पावणेगांव येथे वाहनांसाठी वाहन तळ बनविणे. | 37<br>फेब्रुवारी | 857<br>20/02/2016 | मंजूर |
| 32. | **श्री. गणेश गं. म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 111, मधील सेक्टर 46अे प्लॉट नं. 6 एकुण क्षेत्रफळ 5000 चौ.मी. हे नवी मुंबई महानगरपालिकेचे मद्यान असून ते खेळण्यासाठी पूरेसे नाही. लहान मद्यान असल्यामुळे बऱ्याचदा क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंनी चेंडू टोलवला असता चेंडू शेजारील इमारतीच्या घरांच्या खिडक्यांना लागून त्या ठिकाणी खिडकीच्या काचा तूटणे तसेच शेजारी उभ्या असलेल्या वाहनांच्या काचेला लागून वाहनांची देखील काच तुटलेली आहे. त्यामुळे त्या ठिकाणी नेहमी वाद होण्याचे प्रकार घडतात. सिवूड-नेरुळ परिसरात एक ही तरणतलाव नाही त्यामुळे या ठिकाणच्या नागरीकांची गद्धसोय होत आहे. परंतू सदर मद्यानात महानगरपालिकेने तरण तलावाची निर्मिती केल्यास नेरुळ सिवूड तसेच बेलापूर विभागातील नागरीकांना त्याचा लाभ घेता येईल तरी कृपया सदर मद्यानात तरण तलाव तयार करणे. | 38<br>फेब्रुवारी | 858<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 33. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. सेक्टर 9 एन येथील संरक्षण भिंतीची उंची वाढविणे. | 39 / फेब्रुवारी | 859 / 20/02/2016 | मंजूर |
| 34. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सी.बी.डी. सेक्टर 9 येथील पिपल्स शाळेच्या मागील बाजूस संरक्षण भिंतीची दुरुस्ती करणे. | 40 / फेब्रुवारी | 860 / 20/02/2016 | मंजूर |
| 35. | **श्री. अशोक बा. गुरखे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 102, सुनिल गावस्कर मद्यान येथील असलेल्या झोपडपट्टीमध्ये शौचालय बांधून व मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे. | 41 / फेब्रुवारी | 861 / 20/02/2016 | मंजूर |
| 36. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101 मधील पारसिक हिल येथील रहिवाश्यांच्या सोयीसाठी प्रत्येक बंगलोकडे जाणाऱ्या रस्त्याला दिशादर्शक नामफलक उभारणे. | 42 / फेब्रुवारी | 862 / 20/02/2016 | मंजूर |
| 37. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101 मधील आयकर कॉलनी येथील सांदिपनी को.ऑ.हौ.सो. समोरील डोंगराच्या पायऱ्यांपासुन ते डी टाईप येथील पोलीस बीट मार्शल चौकीपर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला असलेली नादुरुस्त संरक्षण भिंत नव्याने बांधणे. | 43 / फेब्रुवारी | 863 / 20/02/2016 | मंजूर |
| 38. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101 मधील आग्रोळी गांव येथील गजानन पाटील यांच्या घरापासून ते महेंद्र वास्कर यांच्या घरापर्यंत व विजय म्हात्रे यांचे घर ते शंकराच्या मंदिरापर्यंत मुख्य रस्त्याच्या कडेला असलेल्या नादुरुस्त गटारावर हेवी डयूटी स्लब टाकून नव्याने गटारे बांधणे. | 44 / फेब्रुवारी | 864 / 20/02/2016 | मंजूर |
| 39. | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 2, रामनगर येथील ओवर हेड Electric Wire भुमिगत करणे. | 45 / फेब्रुवारी | 865 / 20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **40.** | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 2, ईश्वरनगर येथे बालाजी नगर मध्ये समाजमंदिर बांधणे. | 46<br>फेब्रुवारी | 866<br>20/02/2016 | मंजूर |
| **41.** | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 2, ईश्वरनगर येथे सेवरेज लाईन टाकणे. | 47<br>फेब्रुवारी | 867<br>20/02/2016 | मंजूर |
| **42.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 5, कन्हय्यानगर येथे 5 लाख लिटरची पाण्याची टाकी बांधणे. | 48<br>फेब्रुवारी | 868<br>20/02/2016 | मंजूर |
| **43.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 5, सुभानगर येथे शाळेच्या वर्ग खोल्या बांधणे. | 49<br>फेब्रुवारी | 869<br>20/02/2016 | मंजूर |
| **44.** | **श्री. जगदिश नाना गवते, यांजकडून :-** ठाणे बेलापूर रोडवर मुकुंद कंपनी जवळ नागरिकांना रस्ता ओलांडण्यासाठी नविन स्काय वॉक बांधणे. | 50<br>फेब्रुवारी | 870<br>20/02/2016 | मंजूर |
| **45.** | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35, घणसोली विभागाच्या नागरी वसाहत क्षेत्राला लागुन वाहणाऱ्या मोठया नाल्याची पुर्नबांधणी करुन त्या नाल्यालगत संरक्षक भिंत उभारणे. | 51<br>फेब्रुवारी | 871<br>20/02/2016 | मंजूर |
| **46.** | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35, घणसोली प्रभागामध्ये शहर नियोजन आराखडयानुसार आरक्षित असलेल्या भुखंडावर सार्वजनिक आरोग्यलयाची उभारणी करणे. | 52<br>फेब्रुवारी | 872<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 47. | **सौ. उषा पुरुषोतम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 56, मध्ये जेष्ठ नागरिकांच्या करमणुकीकरीता कोणतेही साधन नाही त्यामुळे त्यांची फार मोठी गैरसोय होत आहे. संध्याकाळी जेव्हा जेष्ठ नागरिक घराबाहेर पडतात तेव्हा त्यांना बसण्यासाठी कुठेही हक्काची जागा नाही. म्हणून प्रभाग क्र. 56, मध्ये जेष्ठ नागरिकांकरिता विरंगुळा केंद्र बांधणे. | 53<br>फेब्रुवारी | 873<br>20/02/2016 | मंजूर |
| 48. | **श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेमधील कोणत्याही कर्मचारी भरतीमध्ये पालिकेतील सुशिक्षित सफाई कामगार व त्यांच्या सुशिक्षित मुलांना प्रथम प्राधान्य देणे. | 54<br>फेब्रुवारी | 874<br>20/02/2016 | मंजूर |
| 49. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 38 कोपरखैरणे मध्ये महापे ब्रीज ते राजधानी स्विट पर्यंत फुटपाथला सेफ्टी ग्रील लावणे | 55<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 50. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 38 कोपरखैरणे मध्ये वरिष्ठा हॉटेलच्या मागील फुटपाथ व त्याच रोडवर शाळा क्र. 38 वरील रोडला सेफ्टी ग्रील लावणे | 56<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 51. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 38 मध्ये पंचवटी हॉटेलच्या बाजूला असलेल्या रिक्षा स्टँड वरील अतिक्रमण हटवून त्याचे सुशोभिकरण करणे. | 57<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 52. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96 सेक्टर 16 मध्ये एकही सुलभ शौचालय किंवा मुतारी नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी सर्वेक्षण करुन आवश्यक तिथे सुलभ शौचालय किंवा ई टॉयलेट ची सुविधा उपलब्ध करुन देणे. | 58<br>फेब्रुवारी | 875<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 53. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96 सेक्टर-16 ए व सेक्टर 14 मधील रस्त्याची दुरावस्था झाली आहे. ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना आणि नागरिकांना त्रास होत आहे. सदर रस्त्याची गेली 10 वर्षे डागडुजी ही करण्यात आलेली नाही. तरी नेरुळ सेक्टर-16 ए व सेक्टर 14 मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 59<br>फेब्रुवारी | 876<br>20/02/2016 | मंजूर |
| 54. | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 96 सेक्टर-16 येथील सी ब्रिज टॉवर लगत असलेल्या मोठया गटारावर झाकणे नाहीत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे व परत त्या गटारात माती व घनकचरा जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्या गटारांवर झाकणे बसविणे. | 60<br>फेब्रुवारी | 877<br>20/02/2016 | मंजूर |
| 55. | **श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-** सार्वजनिक प्राधिकरणांना अपारंपारिक स्त्रोत माध्यमाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून योजना प्रकल्पांच्या संदर्भाने अनुदान, मदत इ. स्वरुपाने तरतुद केलेल्या निधीतुन ठाणे बेलापूर व पाम बीच मार्गावर सौर उर्जेचा वापर करुन एल.ई. डी. पथ दिव्यांची उभारणी करणे. | 61<br>फेब्रुवारी | 878<br>20/02/2016 | मंजूर |
| 56. | **श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ मुलुंड ऐरोली येथील दिवा सर्कल येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभारणे. | 62<br>फेब्रुवारी | 879<br>20/02/2016 | मंजूर |
| 57. | **सौ. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 88, प्लॉट नं. 1, सेक्टर 29 मध्ये 600 मीटर भुखंड पार्किंगसाठी रिकामा ठेवला आहे त्या भुखंडाला सब डिव्हीजन करुन 500 मीटर मध्ये बहुउद्देशीय इमारत बांधणे. | 63<br>फेब्रुवारी | 880<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 58. | **सौ. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 88, सेक्टर 3 ते 11 येथे बस डेपो ते सेंट ऑगस्टीन शाळेपर्यंत नागरिक व विदयार्थी मोठया प्रमाणात ये जा करीत असतात सदर रस्त्यावर वाहनांची मोठया प्रमाणात वर्दळ असल्याने सदर ठिकाणी लवकरात लवकर स्कायवॉक बांधणे. | 64<br>फेब्रुवारी | 881<br>20/02/2016 | मंजूर |
| 59. | **सौ. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 88, प्लॉट नं. 10, सेक्टर 29 मधिल वाहन पार्किंग लगत स्वच्छता अभियान अंतर्गत महिला व पुरुषासाठी सार्वजनिक शौचालय बांधणे. | 65<br>फेब्रुवारी | 882<br>20/02/2016 | मंजूर |
| 60. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108, अंतर्गत सिवुड सेक्टर-48 मधील सर्व बस थांबाची डागडुजी करणे. | 67<br>फेब्रुवारी | 883<br>20/02/2016 | मंजूर |
| 61. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108, अंतर्गत सेक्टर-48 मधील उद्यानाचे नुतनिकरण व सुशोभिकरण करणे. | 68<br>फेब्रुवारी | 884<br>20/02/2016 | मंजूर |
| 62. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-** प्रभाग क्र. 108, अंतर्गत सेक्टर-48 मधील शाळेच्या भुखंडावरील शाळेच्या इमारतीचे काम सुरु आहे. तरी सदर ठिकाणी इंग्रजी माध्यम सोबत कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणे. | 69<br>फेब्रुवारी | 885<br>20/02/2016 | मंजूर |
| 63. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, मध्ये "डी" ब्लॉक येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 70<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 64. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 95, येथे उच्च दाबाचे दिवे बसविणे. | 71<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 65. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 95, रामलिला मद्दान पासून ते नेरुळ तलाव येथील रस्त्यावर डेकोरेटिव्ह पोल बसविणे. | 72<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 66. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 53, येथील निलसिध्दी टावर ते वाशी हद्द पर्यंत गटाराची व फुटपाथची सुधारण करणे बाबत सदर गटर व फुटपाथची सुधारणा आत्तापर्यंत कधीच करण्यात आली नाही तरी सदर गटर व फुटपाथची सुधारणा करणे. | 73<br>फेब्रुवारी | 886<br>20/02/2016 | मंजूर |
| 67. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 53, येथील होल्डींग पाँडचा रस्ता त्याचा लोक जॉगिंग ट्रक्क म्हणून वापर करतात पण त्या रोडला जास्त उंचखाल खड्डे असल्यामुळे लोकांना चालायला त्रास होतो अशी तक्रार से. 12 चे रहिवाशी व जुहुगांव से. 11 चे रहिवाशी करतात तरी त्याच डांबरीकरण करणे. | 74<br>फेब्रुवारी | 887<br>20/02/2016 | मंजूर |
| 68. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 मधील ए.बी.सी.डी. ई. हे जे ग्रुप आहेत ते एल. आय. जी. ची घरे आहेत. त्यांचे ड्रेनेज सिस्टिम ही सिडको कालीन असल्यामुळे ती ड्रेनेज सिस्टिम बदलणे गरजेचे आहे. त्यामुळे ही ड्रेनेज सिस्टिम बदलून देणे. | 75<br>फेब्रुवारी | 888<br>20/02/2016 | मंजूर |
| 69. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 मधील सिडकोच्या राहत्या घरांच्या मधील बाजूस जे मोकळे भुखंड आहे त्या ठिकाणी अतिशय घाणीचे साम्राज्य पसरले आहे. तरी त्या आठ भुखंडावरील मोकळया बाजूस ब्लॉक लावून महीला, लहान मुले व जेष्ठ नागरीकांना बसण्यासाठी बँचेस लावून देणे. | 76<br>फेब्रुवारी | 889<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 70. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12, सेक्टर 2 मधील जे ए.बी.सी.डी. ई. एल. आय. जी. ग्रुपची घरे आहेत. त्या ठिकाणी चौकांमध्ये नागरीकांसाठी बछक व्यवस्था म्हणून बँचेस उपलब्ध करुन देणे. | 77 फेब्रुवारी | 890 20/02/2016 | मंजूर |
| 71. | **सौ. संगीता अशोक पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई ऐरोली मुलुंड ब्रीजजवळ नवी मुंबईचे प्रवेशद्वार लवकरात लवकर उभारण्यात यावे जेणेकरुन नवी मुंबईची वेगळी ओळख निर्माण होईल. | 78 फेब्रुवारी | 891 20/02/2016 | मंजूर |
| 72. | **सौ. संगीता अशोक पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 15, सेक्टर 16 मध्ये दिवाबत्तीची सोय व्यवस्थित नाही. तरी चौकांमध्ये हायमास्ट बसविणे. | 79 फेब्रुवारी | 892 20/02/2016 | मंजूर |
| 73. | **सौ. संगीता अशोक पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 15, सेक्टर 12, 13, 14, व 15 चा उघडा असलेला नाला बंदिस्त करणे. | 80 फेब्रुवारी | 893 20/02/2016 | मंजूर |
| 74. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, मध्ये सेक्टर 18 मध्ये पामबीच येथील सर्व्हीस रोडला जी मधोमध 3 झाडे आहेत त्यांच्या दोन्ही बाजूला रिफ्लेक्टर लावण्यात यावेत जेणेकरुन अपघात होणार नाहीत. | 81 फेब्रुवारी | 894 20/02/2016 | मंजूर |
| 75. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, मध्ये सेक्टर-20 मध्ये बालाजी मंदिरामागून नेरुळ स्टेशनला जाणाऱ्या पायऱ्यांवर येणाऱ्या सांडपाण्याची विल्हेवाट व दिवाबत्तीची व्यवस्था करणे. | 82 फेब्रुवारी | 895 20/02/2016 | मंजूर |
| 76. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, मध्ये सेक्टर-20 कडे आणि 24 कडे जाणाऱ्या रस्त्याच्या चौकात अपुरा प्रकाश असल्यामुळे त्या ठिकाणी गप्रप्रकार घडले आहेत. तरी त्या ठिकाणी हायमास्टचे दिवे लावणे. | 83 फेब्रुवारी | 896 20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **77.** | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 89, मध्ये जेष्ठ नागरीक, मध्यम वर्गीय नागरीक व लहान मुलांना वाचनाकरीता एकही वाचनालय सदर विभागात नसल्याने नागरीकांची मोठया प्रमाणत गैरसोय होत आहे. तरी प्रभाग क्र. 89 च्या मुख्य ठिकाणी वाचनालय उभारणे. | 84<br>फेब्रुवारी | 897<br>20/02/2016 | मंजूर |
| **78.** | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 89, शिरवणे गांवामध्ये प्रकल्पग्रस्त व इतर नागरीक मोठया प्रमाणात राहत असुन प्रभागात विद्युत पुरवठयाचा अभाव असल्याने सायंकाळच्या व रात्रीच्या वेळी प्रकाशा अभावी नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे. तसेच मौल्यवान दागदागिने, मोटार सायकल व चारचाकी वाहने व इतर महागडया वस्तु चोरीच्या घटनेमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने प्रभागात मुख्य चौक व रहदारीच्या ठिकाणी हायमास्ट दिवे लावणे. | 85<br>फेब्रुवारी | 898<br>20/02/2016 | मंजूर |
| **79.** | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 89, शिरवणे गांवामध्ये विविध प्लॉट क्र. आणि सोसायटी आहेत तसेच शिरवणे गांवठाणचा विस्तार मोठा असल्याने चाकरमानी व नवीन येणारे नागरीक यांची दिशा दर्शक फलक नसल्याने गैरसोय होत आहे तरी प्रभाग क्र. 89 मध्ये दिशादर्शक फलक बसविणे. | 86<br>फेब्रुवारी | 899<br>20/02/2016 | मंजूर |
| **80.** | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, मधील "चिकणेश्वर उद्यान" से. 3 येथे उद्यानात "खुली व्यायामशाळा" (open Gym) तयार करणे. | 87<br>फेब्रुवारी | 900<br>20/02/2016 | मंजूर |
| **81.** | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, मधील से. 3 राजधानी समोरील मुख्य रस्ता ते कोपरखैरणे बस डेपो मुख्य रस्त्यावरील पदपथ तयार करणे. | 88<br>फेब्रुवारी | 901<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 82. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, मधील से. 3, 6, 7 मधील सर्व मुख्य रस्त्यावरील पदपथ तयार करुन त्यावर संरक्षक "लोखंडी ग्रील" (Relling) बसविणे. | 89<br>फेब्रुवारी | 902<br>20/02/2016 | मंजूर |
| 83. | **ॲड. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 44 मधील सेक्टर 7 व 15 येथील गटाराची दुरावस्था झालेली असुन ते अनेक ठिकाणी तुटलेले आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सेक्टर 7 व 15 येथील मुख्य रस्त्यावरील हेवी डयुटी गटर बांधण्याची व्यवस्था त्वरीत करणे. | 90<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 84. | **श्री. रामचंद्र बारशा घरत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 66, महापालिका शाळा क्र. 20, 21 व माध्यमिक शाळा क्र. 107 येथील शाळेच्या जागेत खेळण्यासाठी घसरगुंडी, झोपाळे इत्यादी फायबर खेळणी बसविण्यात यावी व स्टेज बांधणे. | 91<br>फेब्रुवारी | 903<br>20/02/2016 | मंजूर |
| 85. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गरजु व गरीब नागरिकांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण योजना व रिक्षा चालविणे प्रशिक्षण व वाहन परवाना (महिलांकरीता) सन 2016-2017 या आर्थिक वर्षात सुरु करणे. | 92<br>फेब्रुवारी | 904<br>20/02/2016 | मंजूर |
| 86. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 85, कुकशेत येथे उर्वरित ठिकाणी दिशादर्शक फलक बसविणे. | 93<br>फेब्रुवारी | 905<br>20/02/2016 | मंजूर |
| 87. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 85, सारसोळे सेक्टर-6. परिसरात बांधण्यात आलेल्या काही गटारांवर पेव्हरब्लॉक लावणे बाकी आहे. सदर ठिकाणी लवकरात लवकर पेव्हरब्लॉक लावून अर्धवट असलेले काम पूर्ण करणे. | 94<br>फेब्रुवारी | 906<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 88. | **सौ. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, सारसोळे व सेक्टर-6. परिसरात रस्त्याच्या वळणावर काही ठिकाणांवर जाळीची झाकणे बसविल्याने रहदारीतील अडथळा दूर झालेला आहे. तशाच प्रकारची हेव्ही डयुटी जाळीची झाकणे प्रभागात इतर ठिकाणी लावणे. | 95<br>फेब्रुवारी | 907<br>20/02/2016 | मंजूर |
| 89. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 86, सेक्टर-6 नेरुळ येथील समाजमंदिर कमी क्षमतेचे असल्याने सारसोळे सेक्टर-6 येथील नागरिकांची गरज पाहता सदर ठिकाणी मोठी वास्तु बांधून नागरिकांची होणारी गैरसोय दुर करणे. | 96<br>फेब्रुवारी | 908<br>20/02/2016 | मंजूर |
| 90. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 86, सारसोळे सेक्टर-6. परिसरातील शौचालयाची दुरावस्था पाहता शौचालय नुतनीकरण करणे. | 97<br>फेब्रुवारी | 909<br>20/02/2016 | मंजूर |
| 91. | **सौ. जयश्री एकनाथ ठाकुर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 86, सारसोळे सेक्टर-6. परिसरातील नामफलकांची झालेली दुरावस्था सुधारणे. | 98<br>फेब्रुवारी | 910<br>20/02/2016 | मंजूर |
| 92. | **श्री. घन:श्याम मढवी, यांजकडून :**<br>सिडको महामंडळाने नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत 541 भुखंड विविध सामाजिक सुविधांसाठी राखीव ठेवलेले आहेत. सदर भुखंड लवकरात लवकर नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे. | 99<br>फेब्रुवारी | 911<br>20/02/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 93. | **श्री. घन:श्याम मढवी, यांजकडून :-** शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाने दि. 25/08/2015 रोजी ज्या आय.टी. धोरणानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे संपादीत जमिनीवर "एकात्मिक आय. टी. टाऊनशिप" उभारणी करण्याची जी धोरणात्मक तरतूद केली आहे आणि त्यासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला नियुक्त प्रस्तावित" असल्याबाबत दि. 20/10/2015 रोजी आपल्या अधिकारात जी दि. 31/10/2015 रोजीची पेपर नोटीस प्रसिध्द केली आहे, त्या नोटीसीला नवी मुंबई महानगरपालिकेकडून हरकत घेणे. | 100<br>फेब्रुवारी | 912<br>20/02/2016 | मंजूर |
| 94 | **श्री. ममित विजय चौगुले, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 23, ऐरोली, सेक्टर 10 हा खाडी किनारीचा भाग आहे. 21 जानेवारी 2016 रोजी चड्डी-बनियान टोळीने या भागात दरोडा घालून खाडी किनारी असणाऱ्या खारफुटी मध्ये लपण्यासाठी पळ काढला अशी शंका आहे. या दरोडयामुळे येथील रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी से. 10 मध्ये प्रवेश करणाऱ्या डी.ए.व्ही. पब्लिक स्कूल, गणपती मंदिर व प्रतिक सोसायटी येथील प्रमुख मार्गांना प्रवेशद्वार बांधणे. | 101<br>फेब्रुवारी | 20/02/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**